# घटक ४ : माहिती सेवा

माहिती ही सर्व सामाजिक घटकांची आवश्यक बाब झाली आहे. माहिती निर्मितीच्या क्षेत्रात समाजातील वैयक्तिक घटक तसेच विविध संस्था यांचा सहभाग असतो. जसे, शिक्षण संस्था, विद्यापीठे, संशोधन व विकास संस्था यांच्यामार्फत होणारे संशोधन अथवा प्रगत अभ्यासामुळे नवीन माहिती व ज्ञानाचा विकास होतो. तसेच शासकीय प्रशासनाद्वारे विविध प्रकारची माहिती निर्माण होत असते. नव्याने निर्माण झालेली माहिती ही विविध माहिती माध्यमांद्वारे उपभोक्त्यांपर्यंत नेण्याचे कार्य केले जाते. ही माहिती छापील स्वरूपात किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे वितरीत व प्रकाशित केली जाते. छापील स्वरूपातील माहिती ही प्राथमिक साधने (उदा.,नियतकालिके, स्टँडर्डस्, पेटंटस्, प्रबंध इत्यादी), द्वितियक साधने (सारस्वरूप नियतकालिके, निर्देशन नियतकालिके इत्यादी), तसेच तृतियक साधने (उदा., निर्देशिका, सूचींची सूची, मार्गदर्शिका इत्यादी) स्वरूपात असतात. इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध होणाऱ्या माहिती साधनांना ई-रिसोर्सेस असे संबोधतात. उदा., ई-बुक्स, ई-जर्नल्स, ई-सारस्वरूप नियतकालिके इत्यादी. ही माहिती साधने विविध माहिती सेवांच्या आधारे वाचकांपर्यंत पोहचवली जातात.

ग्रंथालयामध्ये उपलब्ध असलेल्या छापील व इलेक्ट्रॉनिक वाचन साहित्यामधून वाचकांना हवी असणारी माहिती योग्य वाचकाला योग्य वेळेत देण्याचे कार्य माहिती सेवांद्वारे केले जाते.

## ४.१ माहितीविषयक गरजांचे प्रकार

वाचकांना विविध स्वरूपाच्या माहितीची आवश्यकता असते. वाचकांना माहिती ही त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी हवी असते. वाचकांच्या माहितीविषयक गरजांचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की वाचक हे साधारणतः खालील प्रकारच्या दृष्टिकोनांतून माहितीची मागणी करतात.

**(i) अद्ययावत माहितीची गरज (Current Information Needs) :** वाचकांना विशिष्ट प्रकारचा अभ्यास करताना अद्ययावत माहितीची गरज असते. अशी माहिती नव्याने प्रकाशित झालेल्या वाचन साधनांद्वारे अभ्यासकांना उपलब्ध करून दिली जाते. अशा स्वरूपाच्या माहितीच्या गरजेस अद्ययावत माहितीची गरज असे संबोधले जाते. अशी माहिती प्राथमिक माहिती साधनांमधून दिली जाते.

**(ii) व्यापक माहितीची गरज (Exhaustive Information Needs) :** जेव्हा वाचकांना एखाद्या विषयासंदर्भात व्यापक स्वरूपातील (सखोल प्रमाणावर) माहितीची अभ्यासासाठी गरज असते अशा माहितीविषयक गरजेस व्यापक माहितीची गरज असे म्हणतात. अशी माहिती मिळवितांना वाचकांना अद्ययावत तसेच पूर्वलक्षी माहितीची गरज असते. अभ्यासकांच्या अशा माहितीविषयक गरजांची परिपूर्ती करण्यासाठी व्यापक वाङ्मयशोध (Literature search) घेतला जातो.

**(iii) दैनंदिन माहितीची गरज Day-to-Day Information Needs) :** अभ्यासकांना त्यांच्या दैनंदिन अभ्यास, संशोधन व इतर कार्यांमध्ये विशिष्ट माहितीची गरज असते. उदा., एखाद्या संशोधकास त्याच्या संशोधनाचे प्रयोग करत असताना एखाद्या केमिकल कंपाउंडचा बॉइलिंग पॉईंट संदर्भात माहिती हवी असल्यास अशा माहितीची गरज ही वस्तुस्थितीविषयक (Factual) माहितीशी संबंधित असते. यामध्ये एखाद्या शब्दाच्या अथवा संज्ञेच्या स्पेलिंगपासून एखाद्या औद्योगिक संस्थेचा टेलिफोन क्रमांक अशा स्वरूपाच्या माहितीचीही गरज भासू शकते.

**(iv) कॅचिंग-अप माहितीची गरज (Catching-up Information needs) :** अभ्यासकास त्याच्या अभ्यास विषयाव्यतिरिक्त इतर विषयांची माहिती त्याच्या संशोधन व अभ्यासासाठी हवी असते. अशी माहिती त्याला संक्षिप्त स्वरूपात हवी असते. अशा माहितीस कॅचिंग अप माहितीची गरज असे म्हणतात.

## ४.२ ग्रंथालये आणि माहिती सेवा

ग्रंथालयांमध्ये माहितीचे प्रसारण हे माहिती सेवांमार्फत वाचकांपर्यंत नेण्याचे काम केले जाते.

ग्रंथालये सर्वसाधारणपणे दोन प्रकारच्या माहिती सेवा प्रदान करतात.

**(i) मागणीपूर्व माहिती सेवा :** वाचकांच्या गरजा लक्षात घेऊन मागणी येण्यापूर्वीच काही सेवांची निर्मिती ग्रंथालयांद्वारे केली जाते. अशा सेवांना मागणीपूर्व माहिती सेवा असे म्हणतात.

**(ii) मागणी आधारित माहिती सेवा :** यामध्ये वाचकांनी मागणी केल्यानंतर त्यांच्या माहितीविषयक समस्या सोडविण्यासाठी ज्या सेवा दिल्या जातात त्यांना मागणी आधारित माहिती सेवा असे म्हणतात.

**मागणीपूर्व माहिती सेवा व मागणी आधारित सेवा यातील फरक पुढीलप्रमाणे**

| मागणीपूर्व माहिती सेवा (Anticipatory Information Services) | मागणी आधारित माहिती सेवा (Responsive Information Services) |
|---|---|
| वाचकांकडून त्यांची माहिती विषयक गरजा लक्षात घेऊन या सेवा अगोदरच निर्माण केल्या जातात. | वाचक जेंव्हा ग्रंथालयात येऊन माहितीची मागणी करतात तेव्हा माहितीचा शोध घेऊन त्यांच्या माहितीविषयक गरजेची परिपूर्ती केली जाते. |
| वाचक कोणत्याही माहितीविषयक प्रश्नाची मागणी करीत नाही. परंतु, त्यांच्या वाचनविषयक गरजा लक्षात घेऊन मागणीपूर्व सेवा ग्रंथालयाकडून निर्माण केल्या जातात. | वाचकाने कोणत्याही प्रकारच्या प्रश्नाशी निगडीत माहिती ग्रंथालयात येऊन मागणी केल्यानंतर ही सेवा दिली जाते. |
| ग्रंथालयाकडून वाचकांच्या सर्वसामान्य माहितीविषयक गरजा लक्षात घेऊन विविध माहिती सेवा निर्माण केल्या जातात. | अशा प्रकारच्या माहिती सेवेमध्ये वाचक पत्ररूपाने, दूरध्वनीद्वारे, ई-मेलद्वारे करू शकतो. |
| उदा., प्रचलित जागरूकता सेवा (सार सेवा, निर्देशन सेवा, आढावा वाङ्मय सेवा, आर्टिकल अलर्ट, मंथली लिस्ट ऑफ ॲडिशन्स, सर्क्युलेशन ऑफ पिरिऑडिकल इश्यू, रिडर्स ॲडव्हायझरी सेवा आणि वृत्तपत्र कात्रण सेवा इत्यादी. | उदा., ग्रंथालयातील विविध साधने, तांत्रिक सेवा व ग्रंथालयाचा प्रत्यक्ष वापर यासंबंधी मदत करणे, शीघ्र व विलंबित संदर्भसेवा (साहित्य शोध, सूची तयार करणे, भाषांतर सेवा इत्यादी). |

### ४.२.१ संदर्भसेवा व माहिती सेवा यातील फरक पुढीलप्रमाणे:

| संदर्भसेवा | माहिती सेवा |
|---|---|
| वाचकांना प्रत्यक्ष वैयक्तिक स्वरूपातील साहाय्य | वाचकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरूपात माहिती सेवा |
| संदर्भसेवांचे दोन प्रकार : (१) शीघ्र संदर्भसेवा (२) विलंबित संदर्भसेवा | माहिती सेवांचे दोन प्रकार : (१) मागणीपूर्व माहिती सेवा (२) मागणी आधारित माहिती सेवा |
| ही पारंपरिक सेवा आहे. | ही आधुनिक सेवा आहे. |
| या सेवेत प्रत्यक्ष माहिती देणे, अथवा ज्या साधनात माहिती उपलब्ध आहे असा प्रलेख देणे, अथवा माहिती कोठे उपलब्ध आहे ते दर्शवणे. | एखाद्या विषयावरील माहिती वाचकास प्रदान करणे. |
| मागणीनंतर माहिती दिली जाते. | मागणीपूर्व माहिती सेवांची निर्मिती केली जाते. |
| वाचकांकडून मागणी येईल तेव्हाच ती दिली जाते. यास पॅसिव्ह सर्व्हिस (Passive Service) असेही म्हणतात. उदा., प्रलेखाचा शोध घेणे, वाङ्मयशोध करणे, सूची तयार करणे, ग्रंथालयाच्या वापरासंदर्भात वाचकांना प्रशिक्षण देणे इत्यादी. | मागणी येण्यापूर्वीच माहिती सेवांची निर्मिती केली जाते. या सेवांना ॲक्टिव्ह सेवा (Active Service) असेही म्हणतात. उदा., प्रचलित जागरूकता सेवा, सार सेवा, निर्देशन सेवा, माहिती साक्षरता कार्यक्रम, इंटरनेट आधारित सेवा इत्यादी. |

### ४.२.२ माहिती सेवांचे प्रकार

माहिती सेवांअंतर्गत ग्रंथालयाद्वारे खालील प्रमुख सेवा दिल्या जातात.

**(I) प्रचलित जागरूकता सेवा** (Current Awareness Service) : वाचकांना त्यांच्या विषयासंदर्भात अद्ययावत माहिती पुरविण्याचे कार्य ही सेवा करते. या सेवेमध्ये नव्याने प्रकाशित झालेल्या मुद्रित अथवा अमुद्रित माहिती साधनांमधून माहितीचा शोध घेऊन अभ्यासकांना ती दिली जाते. ज्यामुळे वाचकांच्या अद्ययावत माहिती विषयक गरजांचे समाधान होते. तंत्रज्ञानाच्या युगात या सेवा तंत्रज्ञानाद्वारे पुरविल्या जातात.

**प्रचलित जागरूकता सेवांचे प्रकार :** या सेवेअंतर्गत खालील माहिती सेवांचा अंतर्भाव होतो.

**(१) प्रलेखन याद्या :** (Documentation Lists) : या प्रकारची प्रचलित जागरूकता सेवा सामान्यपणे सर्वच ग्रंथालयांमध्ये दिली जाते. या सेवेतील उदाहरणे पुढीलप्रमाणे :

**(अ) ॲक्सेशन लिस्ट** (Accession List): यामध्ये ग्रंथालयात नव्याने आलेल्या ग्रंथांची ही यादी असते. अशा याद्या आठवड्यातून एकदा, पंधरवड्यातून किंवा महिन्यातून एकदा प्रकाशित केल्या जातात. त्याचबरोबर प्रलेख देखील प्रदर्शित (display) केले जातात. या याद्यांना 'लिस्ट ऑफ ॲडिशन्स' असे संबोधले जाते.

**(ब) टेबल ऑफ कन्टेंटस्** (Table of Contents) : संशोधनाकरिता नवीन घडामोडींविषयी जागरूकता असणे अत्यंत महत्त्वाचे असते. हे साधारणतः प्राथमिक माहिती स्रोतांतून प्रकाशित केले जातात. संशोधनातील नियतकालिकांचा सहभाग, संशोधन प्रकल्पांचा अहवाल यांचा अंतर्भाव महत्त्वपूर्ण ठरतो. यासाठी ग्रंथपाल नियतकालिकांमधील व नवीन प्रकाशित ग्रंथांमधील अनुक्रमणिका (Table of Contents) वाचकांना पाठवतो.

**(२) निवडक माहितीचे प्रसारण** (Selective Dissemination of Information) : या सेवेमध्ये 'सब्जेक्ट प्रोफाईल' व 'युजर प्रोफाईल' असे दोन संच असतात. युजर प्रोफाईलमध्ये संशोधकांच्या नावांची माहिती असते. तर 'सब्जेक्ट प्रोफाईल'मध्ये वाचकांच्या संशोधन विषयाच्या नोंदी असतात. ग्रंथालयात आलेले साहित्य हे विषयानुसार वर्गीकृत करून 'सब्जेक्ट प्रोफाईल'मध्ये समाविष्ट केले जाते. विषय प्रोफाईल व वाचक प्रोफाईल यांची एकमेकांशी जुळणी (Matching of profiles) करून ही माहितीसेवा दिली जाते. यामधून वाचकांना त्यांच्या विषयावरील माहिती पाठवली जाते. ही सेवा व्यक्तिगत सेवा होय. ही सेवा मुख्यतः वैयक्तिक किंवा संशोधकांच्या विशिष्ट गटास त्यांच्या संशोधन विषयाशी संबंधित माहिती प्रसारित करते. परंतु, निवडक माहितीचे प्रसारण सेवेमध्ये ग्रंथालयात आलेले वाचन साहित्य हे वाचकास त्याच्या संशोधन विषयाशी संबंधित असल्यास नियमितरित्या दिले जाते. या सेवेची संकल्पना एच. पी.ल्युन (H.P.Luhn) यांनी १९६१ मध्ये उदयास आणली. ही सेवा संगणकाद्वारे माहितीचे संकलन, विश्लेषण व वाचकांच्या गरजेशी जुळणी करून दिली जाते.

**(३) वृत्तपत्र कात्रण सेवा** (Newspaper Clipping Service) : वृत्तपत्रे जगभरातील चालू घडामोडींविषयीची माहिती देतात. वृत्तपत्रामध्ये समाजातील प्रत्येक घटकासाठी हव्या असलेल्या माहितीचा समावेश केलेला असतो. सामाजिक उपयुक्ततेप्रमाणेच ग्रंथालय व माहिती केंद्रात वृत्तपत्रांतील विविध घटकांवर माहिती संकलित करून वाचकांना ही सेवा देण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण योगदान देतात. या सेवेस वृत्तपत्र कात्रण सेवा असे म्हणतात. कात्रण सेवा ई-मेलद्वारेही दिली जाऊ शकते.

**(४) संशोधन प्रगती सेवा** (Research in progress Service) : ही सेवाही प्रचलित जागरूकता सेवा यामध्ये येते. या सेवेचा उपयोग संशोधन आणि विकास कार्यामध्ये केला जातो. या सेवेद्वारे ज्या संशोधन विषयावर कार्य चालू आहे अशा विषयांची यादी प्रकाशित करून अभ्यासकास संशोधन कार्यात मदत केली जाते. या सेवेमार्फत विविध स्तरांवर कुठेही

चालू असलेल्या संशोधन प्रकल्पांविषयीची माहिती प्रसारित केली जाते. अशा माहितीमुळे संशोधनाची द्विरुक्ती (पुनरावृत्ती) टळते (avoid duplication).

**(II) संक्षेपित माहिती सेवा (Condensed Information Service) :** अशा सेवांतर्गत एखाद्या विषयावरील नव्याने प्रकाशित झालेल्या वाचन साहित्यातील माहिती संक्षिप्त रूपात त्याच्या सूचीय तपशीलांसह संशोधकांना दिली जाते. यामुळे वाचकांना त्यांच्या संशोधन विषयावरील प्रकाशित माहितीचा थोडक्यात आढावा प्राप्त होतो. संशोधकास याचा खूप उपयोग होतो. मूळ प्रलेख वाचनातील वेळेची बचत होऊन तो त्याचा वेळ संशोधनाकरता उपयोगात आणू शकतो. कारण प्राप्त झालेल्या संक्षिप्त माहितीच्या आधारे त्याला त्याच्या विषयाशी संबंधित मूळ प्रलेख वाचावा किंवा नाही याविषयी तो निर्णय घेऊ शकतो.

काही संक्षेपित माहिती सेवा खाली वर्णन केलेल्या आहेत.

**(१) सारस्वरूप माहिती सेवा (Abstracting Information Service) :** या सेवेअंतर्गत नुकत्याच प्रकाशित झालेल्या नियतकालिकांतील लेख, संशोधन अहवाल, पेटंटस्, मानके, प्रबंध, संशोधन प्रकल्प, परिषदांमध्ये सादर केलेले संशोधनपर निबंध इत्यादींचा थोडक्यात सारांश संबंधित प्रलेखांच्या सूचीय तपशीलासह एकत्रितरित्या संकलित करून वाचकांपर्यंत सारस्वरूप नियतकालिकांमार्फत प्रसारित केले जातात. उदा., केमिकल ॲबस्ट्रॅक्टस्, फिजिक्स ॲबस्ट्रॅक्टस्, बायोलॉजिकल ॲबस्ट्रॅक्टस्, लायब्ररी अँड इन्फरमेशन सायन्स ॲबस्ट्रॅक्टस् (LISA, London) इत्यादी.

संगणक युगामध्ये सारस्वरूप नियतकालिकांचे रूपांतर डेटाबेसमध्ये झालेले आहे. यामुळे माहितीशोध हा संगणकाद्वारे जलदगतीने ऑनलाइन अथवा ऑफलाइन पद्धतीनेही केला जातो.

**(२) डायजेस्ट सर्व्हिस (Digest Service) :** अशा प्रकारची सेवा ही मुख्यत्वेकरून औद्योगिक क्षेत्रात, समष्टी संस्था (Corporate houses), व्यापारी संस्था यांना दिली जाते. या सेवेअंतर्गत अद्ययावत, शास्त्रीय, तांत्रिक, विपणनविषयक व व्यापारविषयक नवीन उत्पादने, व्यवस्थापन पद्धती, पेटंटस् इत्यादींविषयी आवश्यक माहिती पुरवली जाते. वरील संस्थांना त्यांच्या कार्यांसाठी अद्ययावत माहिती हवी असते.

- नवीन उत्पादनांविषयीची माहिती
- नवीन तंत्रज्ञानाविषयीची माहिती
- उत्पादन प्रक्रियेसंदर्भातील नवीन माहिती
- विपणनासंदर्भातील माहिती
- व्यवस्थापन माहिती प्रणाली संदर्भातील माहिती
- निर्णय साहाय्यक यंत्रणा/पद्धतीविषयीची माहिती
- तंत्रज्ञान हस्तांतरण व पेटंटस् विषयीची माहिती

या सेवेमध्ये माहितीशोध, प्रतिप्राप्ती, माहितीचे विश्लेषण, माहितीचे मूल्यमापन व माहितीची व्यवहार्यता, उपयुक्तता व माहितीचे संक्षेपण (Condensation) या प्रक्रियांचा समावेश होतो.

**(३) वाङ्मयशोध सेवा (Literature search service) :** वाङ्मयशोध सेवा म्हणजे विशिष्ट विषयावर विविध प्रलेखांचा केलेला शोध होय. ज्यामध्ये नियतकालिकातील लेख, ग्रंथ, प्रबंध, पेटंटस्, स्टँडर्डस् व इतर प्रकाशनांचा समावेश होतो.

वाङ्मयशोध हा संशोधक व अभ्यासकांना त्यांच्या क्षेत्रातील संशोधन कार्यात मदत करतो.

**(४) सूची व निर्देश तयार करणे (Compilation of Bibliography and Index) :** ही सेवा वाचकांच्या मागणीनुसार, वाचकांचा हेतू, वाचकांची माहितीविषयक गरज, विषय या आधारे ग्रंथालयात उपलब्ध असलेले किंवा विविध डेटाबेसेसमधून माहिती संकलित करून त्याची सूची करून वाचकास दिली जाते. तसेच विविध संज्ञांच्या आधारे निर्देश नोंदी एकत्रित करून निर्देशन सेवा दिली जाते.

**(५) भाषांतर सेवा (Translation service):** संशोधन कार्याचे निष्कर्ष हे अनेक भाषांमधून प्रकाशित होत असतात. जगामधील प्रकाशित होणाऱ्या प्रलेखांमध्ये साधारणतः पन्नास टक्के साहित्य हे इंग्रजी व्यतिरिक्त

अन्य भाषांतून प्रकाशित होत असते. बहुतांश वाचकांना इंग्रजीशिवाय इतर भाषा अवगत नसतात. परंतु, प्रकाशित झालेले साहित्य त्यांच्या अभ्यासासाठी किंवा संशोधनासाठी उपयुक्त असते. अशा वेळेस अभ्यासकास त्याला अवगत असलेल्या भाषेत भाषांतर करून हवे असते. म्हणून ही भाषांतर सेवा ग्रंथालयांतून दिली जाते.

जागतिक पातळीवर काही भाषांतर केंद्रेही स्थापन झाली आहेत. उदा., इंटरनॅशनल ट्रान्सलेशन सेंटर, नेदरलँड, युरेपियन ट्रान्सलेशन सेंटर, फ्रान्स, निस्केयर, भारत या संस्था भाषांतर सेवा देतात.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

**एफ.ए.क्यू.** (Frequently Asked Questions) **अर्थात नेहमी विचारले जाणारे प्रश्न :** एखाद्या विशिष्ट विषयावर वारंवार विचारले जाणारे प्रश्न आणि उत्तरे यांची ही यादी असते. जिथे सेवेच्या नियमांविषयीचे सामान्य प्रश्न वापरकर्त्यांकडून वारंवार येत असतात. अशा अपेक्षित प्रश्नांना लेख, वेबसाइट्स, ईमेल याद्या आणि ऑनलाइन मंचांमध्ये उत्तरे देण्याचा हा एक मार्ग आहे.




## ४.३ ग्रंथालयातील विस्तारित सेवा (Library Extension Services)

एएलए ग्लॉसरी ऑफ लायब्ररी अँन्ड इन्फरमेशन सायन्स (१९८३) नुसार "ग्रंथालयाच्या नियमित सेवा क्षेत्राबाहेरील व्यक्ती आणि संस्थांना विशेषत: ज्या ठिकाणी ग्रंथालय सेवा उपलब्ध नाहीत अशा घटकांसाठी ग्रंथालयाद्वारे केलेली साहित्य आणि सेवांची (सूचना सेवांसह) तरतूद म्हणजे विस्तारित सेवा होय."

**विस्तारित सेवा देण्यामागचा उद्देश**

(१) ग्रंथालयाचे सामाजिक, सांस्कृतिक आणि बौद्धिक केंद्रात रूपांतर करणे.

(२) ग्रंथालयात कमी वेळेस येणाऱ्या व ग्रंथालयांचा कमी प्रमाणात वापर करणाऱ्या वाचकांचे नियमित वाचकांत रूपांतर करणे.

(३) ग्रंथालयाची प्रतिमा सुधारणे आणि नावलौकिक वाढवणे.

(४) वाचन संस्कृती विकसित करणे.

(५) प्रौढ शिक्षण कार्यक्रमात भाग घेणे.

**विस्तारित सेवा देण्यासाठी आवश्यक बाबी**

(१) विस्तारित सेवांमागे संपन्न ग्रंथ संग्रहाचे पाठबळ ग्रंथालयात असावे.

(२) विस्तारित सेवा पुरविण्यासाठी प्रशिक्षित व अनुभवी कर्मचारी ग्रंथालयात असणे गरजेचे आहे.

(३) ग्रंथालयात मुलभूत सुविधा जसे की एलसीडी प्रोजेक्टर, स्लाईड प्रोजेक्टर आणि माईक अशा दृकश्राव्य साधनांनी युक्त असे प्रेक्षागृह, सभागृह व प्रदर्शन गृह असावे.

(४) ग्रंथपाल हा एक उत्तम संघटक असावा. त्याला समाजाच्या विविध घटकांच्या भिन्न गरजांविषयी माहिती असावी. त्याला ग्रंथालयातील वाचन संग्रहाविषयी इत्यंभूत ज्ञान असावे.

**विस्तारित सेवांचे प्रकार**

विस्तारित सेवांचे काही मुख्य प्रकार खालीलप्रमाणे आहेत.

**(अ) अंतर्गत विस्तारित सेवा :** ग्रंथालयातील वाचन साधनांचा व सेवांचा जास्तीत जास्त उपयोग वाचकांना होण्याकरिता जी कार्ये हाती घेतली जातात त्यांना 'ग्रंथालयांतर्गत विस्तारित सेवा' असे म्हणतात.

या प्रकारा अंतर्गत खालील सेवांचा समावेश होतो.

**(i) ग्रंथालय ओळख आणि माहिती साक्षरता कार्यक्रम** (Library Orientation and Information Literacy) **:** ग्रंथालय वाचकांना ग्रंथालयाचा योग्य आणि प्रभावी वापर कसा करावा याविषयी माहिती द्यावी. अशा वाचकांना, ग्रंथालयात कोणत्या स्वरूपाची वाचन साधने आहेत, त्या वाचन साहित्याचा प्रभावी वापर कसा करावा, ग्रंथालय

कोणकोणत्या सेवा-सुविधा पुरवते इत्यादी बाबींविषयी ग्रंथालय ओळख आणि माहिती साक्षरता व्याख्यान देऊन औपचारिक किंवा अनौपचारिकरित्या अवगत केले जाते. व्याख्यानामध्ये फिल्म अथवा दृक्-श्राव्य माध्यमाचे देखील साहाय्य घेतले जाते.

यासाठी वाचकांकरिता ग्रंथालयाची प्रत्यक्ष सफर (Library Tour) घडवून आणली जाते. यामध्ये ग्रंथालयातील विविध विभाग, विभागवार ठेवलेले ग्रंथ, विविध प्रकारची वाचन साधने, त्यांची कपाटातील रचना, त्यात कोणत्या स्वरूपाची माहिती मिळते, त्यातील माहिती कशी शोधावी, तालिकेतून ग्रंथाविषयी माहिती कशी शोधावी, डेटाबेसेसमधून माहिती कशी शोधावी या विषयी वाचकांना प्रशिक्षण दिले जाते. शक्य झाल्यास छापील स्वरूपातील ग्रंथालयाची नियमावली व माहिती पुस्तिका वाचकांमध्ये वितरीत केली जाते. लायब्ररी गाईडची निर्मिती करून अशा पद्धतीने ग्रंथालयाची ओळख करून दिली जाऊ शकते.

**(ii) वाचक मंडळ (Reader's Club) :** ग्रंथालयामार्फत वाचकांचे वाचन मंडळ स्थापन केले जाते. अशा वाचकांना आवश्यक ग्रंथ साहित्य, सुविधा आणि जागा ग्रंथालयात उपलब्ध करून दिली जाते.

**(iii) सभा, सार्वजनिक व्याख्याने आणि भाषणे :** विविध प्रसंगी विविध विषयांवर प्रसिद्ध व्यक्ती, लेखक किंवा ग्रंथालय व्यावसायिकांची व्याख्याने/व्याख्यानमाला किंवा भाषणे, चर्चासत्रे व परिषदा इत्यादी कार्यक्रम ग्रंथालयामार्फत आयोजित करणे.

**(iv) सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन :** विविध सण-समारंभाच्या निमित्ताने नाटक, सिनेमा, संगीताचे कार्यक्रम, जादूचे प्रयोग, पपेट शो, प्रश्नमंजुषा, निबंध स्पर्धा, किंवा रांगोळी स्पर्धा इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रमांचे ग्रंथालयात आयोजन केले जाते व समाजातील विविध वयोगटातील वाचकांना ग्रंथालयाकडे आकर्षित केले जाते. यद्वारे ग्रंथालयाचे महत्त्व पटवून द्यावे.

**(v) पुस्तक जत्रा आणि प्रदर्शन :** एखाद्या घटनेच्या स्मृतीप्रित्यर्थ तसेच विविध प्रसंगांचे जसे राष्ट्र पुरुषांच्या जयंतीचे व पुण्यतिथीचे औचित्य साधून संबंधित विषयावरील ग्रंथांचे प्रदर्शन आयोजित करणे.



पुस्तक जत्रा आणि प्रदर्शन

दुर्मिळ ग्रंथ, स्थानिक इतिहासावरिल ग्रंथ साहित्य, स्थानिक सणांविषयी माहिती देणारे ग्रंथ साहित्य, कलाकृती, छायाचित्रे, चित्रे यांची प्रदर्शने आयोजित करून समाजाचे लक्ष ग्रंथालयाकडे वेधून घेणे.

**(आ) बहिस्थ विस्तारित सेवा**

जास्तीत जास्त व्यक्तींनी ग्रंथालयाचे वाचक/सभासद होण्यासाठी त्यांना ग्रंथालयाकडे आकर्षित करण्याकरिता जी कार्ये हाती घेतली जातात त्यांना 'बहिस्थ विस्तारित सेवा' असे म्हणतात. या सेवांचे प्रयोजन म्हणजे वाचकांमध्ये ग्रंथालयाच्या अस्तित्वाची व महत्वाची जाणीव करून देणे होय. या सेवेअंतर्गत पुढील उपक्रम राबवले जातात.

**(i) फिरते ग्रंथालय सेवा :** मोबाइल लायब्ररी हे एक फिरते वाचनालय म्हणून वाचकांच्या वापरासाठी ग्रंथसंग्रहाची रचना केलेले वाहन असते. संभाव्य वाचकांपर्यंत ग्रंथ पाठवून ग्रंथालयांच्या सेवांचा विस्तार करतात. जेथे सेवासुविधा पोहोचत नाहीत अशा दुर्गम ठिकाणी किंवा दूरवरच्या प्रदेशातील लोकांना ग्रंथालय सेवा प्रदान करणे व त्यांच्यामध्ये वाचन सवयी रुजवणे




फिरते ग्रंथालय सेवा

हा या मागील प्रमुख दृष्टिकोन आहे. अशी संकल्पना असलेल्या या उपक्रमांतर्गत संस्थेचे वाचनदूत ठराविक पुस्तके घेऊन रेल्वेच्या डब्यांमध्ये देखील फिरतात. विशेष म्हणजे ही सुविधा पूर्णपणे मोफत देण्यात येते.

**(ii) प्रसिद्धी/प्रचार :** वृत्तपत्र, रेडिओ व दूरदर्शनच्या माध्यमातून ग्रंथालयातील सेवासुविधांच्या उपयुक्ततेबद्दल प्रचार करणे.

**(iii) घरपोच सेवा :** ग्रंथालयामार्फत मेल आणि टेलिफोन विनंतीद्वारे ग्रंथ तात्पुरत्या वाचनासाठी उपलब्ध करून देण्याची सेवा दिली जाऊ शकते. 'डायल-अ-बुक' पद्धतीने ग्रंथालय, विनंतीनुसार वाचकापर्यंत ग्रंथ घरपोच पोहोचवू शकतात.

**(iv) ग्रंथालय आऊटरीच सेवा :** म्हणजे अशा ग्रंथालय सेवा ज्या संस्थेच्या आवाराबाहेरील समूहापर्यंत पोहचवणे. बरीच विद्यापीठे आणि महाविद्यालये आपल्या कक्षेबाहेर (परिसराबाहेर, out of campus) जाऊन प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना नवनवीन सेवा देण्यावर भर देतात. सार्वजनिक ग्रंथालये अशा सेवांद्वारे सामान्य नागरिकांना ग्रंथालय सभासद होण्यासाठी प्रोत्साहित करतात.

**(v) सोशल नेटवर्किंग सेवा :** सोशल नेटवर्किंग साईटस् वेब-आधारित असतात. यांच्या आधारे ग्रंथालये वाचकांना इंटरनेटवर विविध प्रकारच्या सेवा प्रदान करतात. ग्रंथालयातील वाचन साधने, सेवा सुविधा, उपक्रम आणि कार्यक्रम इत्यादींविषयी वाचकांना अवगत करतात. यासाठी ई-मेल, इन्स्टंट मेसेजिंग, फेसबुक, ट्विटर, माय स्पेस, लिंक्ड-इन या सोशल नेटवर्किंग टूल्सचा वापर केला जातो.



## ४.४ माहिती साक्षरता (Information Literacy)

'माहिती साक्षरता' ही संकल्पना सर्वप्रथम १९७४ मध्ये पॉल जी झुरकोस्की यांनी नॅशनल कमिशन ऑन लायब्ररीज अँड इन्फरमेशन सायन्सच्या वतीने लिहिलेल्या अहवालात समाविष्ट केलेली होती.

तसेच १९९९ मध्ये स्कोन्यूल (SCONUL = Society of College, National and University Libraries) युके या संस्थेने 'द सेव्हन पिलर्स ऑफ इन्फरमेशन लिटरसी' या शीर्षकाचे मॉडेल प्रकाशित केले. यानंतर अनेक देशांनी माहिती साक्षरतेची प्रारूपे (Models) विकसित केली आहेत.


ग्रंथालय क्षेत्रातील महत्वाची व्यावसायिक संघटना इफ्लाने 'इन्फरमेशन लिटरसी सेक्शन' (माहिती साक्षरता विभाग) स्थापन केला. तसेच 'इन्फरमेशन लिटरसी रिसोर्सेस डिरेक्टरी (या डिरेक्टरीलाच InfoLit Global असेही संबोधतात) प्रकाशित केली. या डिरेक्टरीवर ऑनलाईन पद्धतीने ग्रंथपाल, शिक्षण तज्ज्ञ आणि माहिती व्यावसायिक इत्यादी माहिती साक्षरतेच्या संदर्भातील माहिती (Literature) अपलोड करू शकतात. ग्रंथालये आणि माहिती सेवा पुरवणाऱ्या संस्थांच्या साहाय्याने माहिती साक्षरता शिक्षणाचा आंतरराष्ट्रीय स्तरावर विकास करणे हा इफ्लाच्या माहिती साक्षरता विभागाचा प्रमुख उद्देश होय.

**व्याख्या :** बुर्शिनस, १९७६, यांनी 'माहिती साक्षरता' या संज्ञेची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे.

''माहिती साक्षर होण्यासाठी नवीन प्रकारची कौशल्ये आत्मसात करावी लागतात. यामध्ये समस्येवर उपाय शोधण्यासाठी माहितीचा शोध कसा करावा व प्रतिप्राप्त केलेल्या माहितीचा कार्यक्षमपणे व परिणामकारकपणे उपयोग कसा करावा याचा समावेश होतो.''

थोडक्यात, ज्यांना उपलब्ध माहिती साधनांचा व त्यातील माहिती घटकांचा उपयोग विविध कौशल्ये व तंत्रांच्या आधारे करता येतो. अशा कौशल्यास माहिती साक्षरता असे संबोधले जाते.

माहिती साक्षर व्यक्तींची वैशिष्ट्ये पुढील आकृतीच्या साहाय्याने अधिक स्पष्ट करता येतील.




थोडक्यात, माहिती साक्षरतेमुळे अभ्यासक अत्यावश्यक असलेली माहिती व्यापक प्रमाणावर शोधतो, प्राप्त झालेल्या माहितीचे चिकित्सकपणे मूल्यमापन करू शकतो, प्राप्त केलेली माहिती परिणामकारकपणे उपयोगात आणू शकतो. माहिती वापरल्यानंतर नीतिमूल्यांचा आदर करून योग्य तो संदर्भ देतो.

**माहिती साक्षरतेचे विविध पैलू**

(i) दृश्य साक्षरता (Visual Literacy)

(ii) माध्यम साक्षरता (Media Literacy)

(iii) संगणक साक्षरता (Computer Literacy)

(iv) डिजिटल साक्षरता (Digital Literacy)

(v) नेटवर्क साक्षरता (Network Literacy)

हे सर्व पैलू प्राप्त केलेल्या व्यक्तींना माहिती साक्षर व्यक्ती असे म्हणतात.

## ४.५ इंटरनेट व वेबआधारित माहिती सेवांचे प्रकार

माहिती शोध व माहिती संदर्भातील सहकार्य यामध्ये इंटरनेट व वर्ल्डवाइडवेब या तंत्रज्ञानाने माहिती सेवामध्ये नाविन्य निर्माण केले आहे.

इंटरनेट प्रणालीमुळे जगातील कोणत्याही संगणक नेटवर्क्सशी संपर्क केला जाऊ शकतो.

वर्ल्डवाइडवेब आधारे (www) इंटरनेटवर उपलब्ध असलेली माहिती प्राप्त करता येते. विशिष्ट वेबपेजवरील माहिती प्राप्त करण्यासाठी युआरएलचा (Uniform Resource Locator) वापर केला जातो.

**युआरएलविषयी जाणून घ्या.**

युआरएल, संबंधित वेबपेजशी संपर्क प्रस्थापित करून माहिती प्रसारित करतो. जसे, https://www.iisc.ac.in हा युआरएल इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या संस्थेशी इंटरनेटच्या माध्यमातून जोडून या संस्थेच्या वेबपेजवर असलेली माहिती वाचकास प्राप्त करून देतो.

सध्या वाचक माहिती प्राप्त करण्यासाठी इंटरनेट व वेबचा जास्तीत जास्त वापर करतात. बरेचसे वाचक गुगल व याहू या सर्च इंजिनचा वापर करून माहिती शोधण्याचा प्रयत्न करतात.

वेब व इंटरनेट आधारित सेवा देण्यासाठी विविध माहिती स्रोतांची आवश्यकता भासते व त्याची उपलब्धता इंटरनेटवर असावी लागते.

इंटरनेट व वेबआधारित खालील प्रकारच्या ग्रंथालयीन माहिती सेवा वाचकांपर्यंत प्रसारित करता येतात.

(i) **व्हर्च्युअल लायब्ररी टूर (Virtual Library Tour) :** ग्रंथालयाच्या वेबसाईटद्वारे ही सेवा प्रदान करून ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह, सेवा, पायाभूत सुविधा (infrastructure) या विषयीची ग्रंथालयातील उपलब्धता दर्शविता येते. ग्रंथालयाचा आराखडा (Library Map), ग्रंथालयाच्या इमारतीची अंतर्गत रचना (Floor Plans) आणि ग्रंथालयातील विविध विभाग इत्यादी बाबींचा समावेश व्हर्च्युअल लायब्ररी टूरमध्ये केला जाऊ शकतो. व्हिडिओ सादरीकरणाद्वारे अशा तयार झालेल्या व्हिडिओची लिंक वेबसाईटवर उपलब्ध करून दिली जाते.

(ii) **आस्क-अ-लायब्ररियन :** या सेवेमध्ये वाचक त्याला हवी असलेली माहिती ई-मेलद्वारे किंवा वेबद्वारे विचारू शकतो व माहिती प्राप्त करू शकतो.



(iii) **उपयोजक प्रशिक्षण (User Education) :** बरेचसे एज्युकेशनल टीचिंग टूल्स् इंटरनेटवर उपलब्ध असतात. अशा टूल्सच्या साहाय्याने वाचकांना ग्रंथालय उपयोगाचे प्रशिक्षण देता येते. वाचकांना असलेल्या कोणत्याही समस्येचे निराकरण या सेवेद्वारे केले जाऊ शकते. जसे, गुगल डॉक्स (Google Docs), वर्ड प्रेस इत्यादी.

(iv) **ग्रंथालय वेबपेज (Library Website) :** वाचक ग्रंथालय वेबपेजद्वारे ग्रंथालयाचा वापर करू शकतो. ग्रंथालयातील वेबपेजवर ग्रंथालयात उपार्जित केलेले वाचन साहित्य तसेच ई-वाचन साहित्याला दुवा (Link) प्रस्थापित करून जास्तीत जास्त माहितीचा वापर वाचकास करता येतो व याद्वारे विविध माहिती सेवा पुरवल्या जातात.

(v) **वेब-ओपॅक (Web Online Public Access Catalogue) सेवा :** ही संगणकावर उपलब्ध असलेली ग्रंथसंग्रहाविषयी माहिती देणारी ऑनलाइन तालिका आहे. अनेक माहितीशोध घटकांच्या (ॲक्सेस पॉईंट) साहाय्याने या तालिकेतील माहितीचा शोध घेता येतो. ही तालिका वाचकास २४/७ उपलब्ध होऊ शकते. कोणताही वाचक ही तालिका पाहू शकतो. यासाठी वाचकांनी ग्रंथालयात जाण्याची आवश्यकता नसते. तसेच, वाचकास हव्या असलेल्या ग्रंथाची मागणी व ग्रंथ आरक्षित करू शकतो. तसेच इंटरनेटद्वारा ग्रंथालयातील ओपॅकच्या नोंदी इतर ग्रंथालयेही पाहू शकतात. तसेच वेब-ओपॅकचा वापर करून आंतर-ग्रंथालयीन देवाणघेवाण सेवा दिल्या जातात.

(vi) **डेटाबेसेसमधून माहितीची प्रतिप्राप्ती :** उपलब्ध ऑनलाईन व ऑफलाईन डेटाबेसेसमधून माहितीचा शोध घेऊन ग्रंथालये वाचकांना विविध माहिती सेवा पुरवण्याचे कार्य करू शकतात. तसेच इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या माहिती स्रोतांचा वापर करून माहिती सेवा दिल्या जाऊ शकतात.

(vii) **ई-प्रकाशनाचा वापर करणे (Access and use of e-publications) :** विविध ई-प्रकाशनांचा वापर करून ग्रंथालय माहिती सेवा वाचकांना पुरवल्या जातात. जसे, ई-बुक्स, ई-जर्नल्स, ई-ज्ञानकोश, विकिपीडिया इत्यादी.

(viii) **माहिती साक्षरता उपक्रम राबवणे :** ग्रंथालयामार्फत माहिती साक्षरता कार्यक्रमांची विविध प्रारूपे वेबपेजवर उपलब्ध करून वाचकांकरिता माहिती साक्षरता व त्यास पूरक उपक्रम विकसित करता येतात.

(ix) **व्हर्च्युअल संदर्भ सेवा (Virtual Reference Service) :** ई-संदर्भ साधनांचा वापर करून, संदर्भ ग्रंथपाल वाचकास हव्या असलेल्या माहितीचा या साधनांच्या साहाय्याने शोध घेऊन व्हर्च्युअल संदर्भ सेवा वाचकांपर्यंत पुरवू शकतात.

## ४.६ सोशल मीडिया/नेटवर्किंग (Social Media/ Networking) आधारित माहिती सेवा

सोशल मीडिया हे माहिती संप्रेषणाचे प्रमुख साधन झाले आहे. सोशल मीडियामुळे व्यक्ती व्यक्तींमध्ये मोठ्या प्रमाणावर संपर्क होत आहे. यामुळे माहितीचा विनिमय (Exchange) करणे शक्य आहे. जसे, मायस्पेस, फेसबुक, ब्लॉग, ट्विटर, फ्लिकर, यू-ट्यूब, स्लाइड शेअर, आरएसएस-फीड, लायब्ररी थिंक, ही माहिती ज्ञान साधने वापरून ग्रंथालयातून विविध माहिती सेवा प्रदान केल्या जातात.

सोशल नेटवर्किंग माध्यमाद्वारे विविध माहिती घटकांची माहिती वाचकांपर्यंत पोचविण्यासाठी याचा उपयोग केला जातो. वाचकांनी निर्माण केलेली प्रकाशने प्रसारित करता येतात. जसे, माहितीचे एकत्रीकरण सेवा (Aggregation Services), डेटा मॅश-अप (Data Mashup), विद्वत संप्रेषण (Scholarly Communication), ग्रंथालय परिचय (Library Tour) इत्यादी.

सामाजिक माध्यमांचा विविध ग्रंथालय सेवांमध्ये वापर केल्याने वाचकास माहितीचा शोध व माहिती घेण्याचे चांगले माध्यम उपलब्ध झाले आहे.

## ४.७ माहितीशोध व माहिती प्रतिप्राप्तीची कौशल्ये


माहितीशोध तंत्रांचा योग्य वापर करून डिजिटल स्वरूपातील माहिती शोधाची प्रक्रिया अत्यंत जलद गतीने करता येते.

डेटाबेसमधून माहिती शोधणे हे एक वैशिष्ट्यपूर्ण कौशल्य आहे. डेटाबेसमध्ये उपलब्ध असलेली माहिती शोधण्यासाठी माहितीची शोध पद्धती अचूक असावी लागते. माहिती शोधण्यासाठी विविध तंत्रांचा वापर करता येतो. या तंत्रांची उपयुक्तता, त्याचा वापर, त्याचा परिणाम, याची तंत्रे व कौशल्ये माहिती शोध घेणाऱ्यास व ग्रंथपालास असणे आवश्यक आहे.

**माहितीशोध घेण्याची तंत्रे (Information Search Techniques)**

माहितीशोध घेताना प्रामुख्याने विषयाशी संबंधित मुख्य शब्दाच्या (keywords) आधारे तसेच विविध सूचीय घटकांच्या आधारे जसे, ग्रंथशीर्षक, सहलेखक, संपादक, भाषांतरकार इत्यादी माहितीचा शोध अचूक होण्यासाठी बुलियन सर्च तंत्राचाही (AND, OR, NOT) वापर केला जातो.

डेटाबेसेसमधून माहितीशोध घेताना अथवा माहिती प्रतिप्राप्त करण्यासाठी विशिष्ट तंत्रांची आवश्यकता असते. यामध्ये पुढील तंत्रांचा समावेश होतो. जसे, बुलियन लॉजिक, ट्रंकेशन सर्च, फेडरेटेड सर्च इत्यादी.




## ४.८ वाङ्मय शोध (Literature Search)

वाङ्मयशोधाची प्रक्रिया हे मूलभूत स्वरूपाचे कार्य होय. वाचक विशिष्ट उद्देशाने ग्रंथालयात येतो तेव्हा त्याच्याकरिता वेगवेगळ्या स्वरूपात वाङ्मयशोध ग्रंथपाल अथवा संदर्भ ग्रंथपाल किंवा माहिती अधिकाऱ्यांना करावा लागतो. वाचकांच्या वाचन साधने व माहितीविषयक गरजांचे स्वरूप काय आहे त्या अनुषंगाने वाङ्मयशोध केला जातो. उदा., वाचकाची गरज ही ग्रंथालयातील वाचन साधनांशी संबंधित असेल तर तालिका व उपलब्ध सूची व डेटाबेस आधारे शोध घेतला जातो. थोडक्यात, वाचकांची माहितीविषयक गरज कोणत्याही स्वरूपाची असो, वाङ्मयशोधाचे कार्य हे करावेच लागते.

संशोधन कार्यात 'वाङ्मयशोध' कार्याची भूमिका महत्त्वाची असते. कोणत्याही संशोधकाला त्याच्या संशोधन विषयाशी संबंधित उपलब्ध वाचन साधनांची माहिती करून घ्यावी लागते. यानंतर या उपलब्ध वाचन साधनांची व्यापक सूची तयार करावी लागते.

वाचकांच्या (विद्यार्थी, अभ्यासक, संशोधक, तंत्रज्ञ, समाज संशोधक इत्यादी) माहितीविषयक गरजांची परिपूर्ती करण्यासाठी वाङ्मयशोध केला जातो. यासाठी ग्रंथ, नियतकालिके, निर्देश, सार नियतकालिके, अप्रकाशित वाङ्मय, डेटाबेसेस इत्यादी वाचन साधनांचा उपयोग केला जातो. यासाठी सखोल व व्यापक प्रमाणात वाङ्मयशोध करावा लागतो.

## स्वाध्याय

१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.

१. निवडक माहितीचे प्रसारण सेवा (SDI) या माहिती सेवेची संकल्पना .................. यांनी मांडली.
(अ) एच.पी.ल्यून (क) बुर्शिनस
(ब) पॉल जी.झुरकोस्की
(ड) डॉ.एस.आर.रंगनाथन

२. .................. ही संकल्पना सर्वप्रथम पॉल जी झुरकोस्की यांनी नॅशनल कमिशन ऑन लायब्ररीज अँड इन्फरमेशन सायन्सच्या वतीने लिहिलेल्या अहवालात समाविष्ट केली.
(अ) माहिती सेवा (ब) वाङ्मयशोध सेवा
(क) माहिती साक्षरता (ड) भाषांतर सेवा

३. भारतात .................. ही संस्था भाषांतर सेवा देते.

(अ) नॅशनल ट्रान्सलेशन सेंटर
(ब) निस्केयर (क) इयॅस्लिक
(ड) अस्लिब

४. ग्रंथालय क्षेत्रातील .................... संघटनेने इन्फरमेशन लिटरसी सेक्शन (माहिती साक्षरता विभाग) स्थापन केला.
(अ) एफआयडी (ब) अस्लिब
(क) आयएलए (ड) इफ्ला

**(ब) पुढील संचामधील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. प्रचलित जागरूकता सेवा – मागणीपूर्व माहिती सेवा
२. माहिती साक्षरता संकल्पना – पॉल जी.झुरकोस्की
३. व्हर्च्युअल संदर्भ सेवा सुरुवात – अमेरिकन लायब्ररी असोसिएशन
४. नॅशनल ट्रान्सलेशन सेंटर – फ्रान्स

**(क) खालील विधाने व योग्य कारणे यांची सांगड घालून दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्यायांची निवड करा.**

(१) विधान (अ) : निवडक माहितीचे प्रसारण ही सेवा वाचकांना त्यांच्या विषयांसंदर्भात अद्ययावत माहिती पुरवण्याचे कार्य करते.
कारण (ब) : निवडक माहितीचे प्रसारण सेवा मुख्यतः वैयक्तिक किंवा संशोधकांच्या विशिष्ट गटास त्यांच्या संशोधन विषयाशी संबंधित माहिती प्रसारित करते.
पर्याय : (i) (अ) चूक (ब) बरोबर
(ii) (अ) बरोबर (ब) चूक
(iii) (अ) व (ब) दोन्हीही चूक
(iv) (अ) व (ब) दोन्हीही बरोबर

(२) विधान (अ) : डायजेस्ट सर्व्हिस सेवा ही मुख्यत्वे करून औद्योगिक क्षेत्रात, समष्टी संस्था, व्यापारी संस्था यांना दिली जाते.
कारण (ब) : या संस्थांना त्यांच्या कार्यासाठी अद्ययावत माहितीची गरज असते.
पर्याय : (i) (अ) चूक (ब) बरोबर
(ii) (अ) बरोबर (ब) चूक
(iii) (अ) व (ब) दोन्हीही चूक
(iv) (अ) व (ब) दोन्हीही बरोबर

**(ड) नावे लिहा/ओळखा.**

(१) वाचक त्याला हवी असलेली माहिती ई-मेलद्वारे किंवा वेबद्वारे विचारू शकतो या माहिती सेवेस म्हणतात –
(२) संगणकावर उपलब्ध असलेली ग्रंथसंग्रहाविषयी माहिती देणारी ऑनलाईन तालिका –

**२. पुढील प्रश्नांची दोनशे शब्दांत उत्तरे लिहा**

(१) माहितीविषयक गरजांचे प्रकार सांगून मागणीपूर्व माहितीसेवा व मागणी आधारित माहिती सेवा यांतील फरक स्पष्ट करा.
(२) संदर्भसेवा व माहितीसेवा यातील फरक स्पष्ट करा.
(३) माहिती साक्षरता म्हणजे काय ते सांगून माहिती साक्षर व्यक्तीची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**३. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.**

(१) सामाजिक माध्यमांचा ग्रंथालय सेवांमध्ये वापर केल्याने वाचकास माहिती प्राप्तीचे चांगले माध्यम उपलब्ध झाले आहे.
(२) माहितीशोध तंत्राचा वापर केल्याने डिजिटल स्वरूपातील माहिती शोधाची प्रक्रिया संथ गतीने चालते.

**४. टीपा लिहा.**

(१) माहिती साक्षरता
(२) वाङ्मय शोध
(३) सोशल मीडिया आधारित माहिती सेवा

**५. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) माहिती सेवांच्या विविध प्रकाराविषयी सविस्तर माहिती लिहा.
(२) इंटरनेट व वेबआधारित ग्रंथालयीन माहिती सेवा सोदाहरण स्पष्ट करा.
(३) माहिती सेवा म्हणजे काय ते सांगून माहिती विषयक गरजांचे प्रकार स्पष्ट करा.

**उपक्रम**

(१) वृत्तपत्रातील शिक्षणविषयक लेखांची कात्रण फाईल तयार करा.
(२) ग्रंथपालास ई-मेलचा वापर करून ग्रंथालयाबद्दलची माहिती विचारा.

⌘⌘⌘